भारतीय जनता पार्टी

डॉ किरीट सोमैया
Chartered Accountant, Ph.D

नोव्हेंबर २६, २००८

## खाजगी वने - जंगल राज काबूत आणले

## महाराष्ट्र सरकारला आपले अमानुष, विध्वंसक धोरण मागे घेणे भाग पाडले -डॉ. किरीट सोमैय्या

महाराष्ट्र सरकारच्या जंगल राजवर काबू मिळवला. ३६ महिन्यानंतर, आता राज्य सरकारला ४ ते ६४ वर्षे जुन्या इमारती वने असल्याचे जाहीर करणे, प्रतिज्ञापत्र सादर करणे आणि मुबई उच्च न्यायालयात ते वन असल्याचे प्रतिपादन करणे हे धोरण बदलणे भाग पडले आहे.

दिल्ली येथे सीइसीसमोर झालेल्या सुनावणीत, सरकारने आता वास्तव स्वीकारले आहे आणि डॉ. किरीट सोमैय्या आणि रहिवाशांची सराकारी भूमिका योग्य प्रकारे सुधारण्याची मागणी मान्य केली आहे.

या ठिकाणी आठवण करून द्यावीशी वाटते कि ११ नोंव्हेंबर २००८ रोजी झालेल्या सुनावणीत राज्य सरकारने डॉ. किरीट सोमैय्यांच्या एकाच फटक्यात ४.५ लाख रहिवाशांना दिलास देण्याच्या मागणीला आक्षेप घेतला होता. तथापि, सीइसीनी शेवटी जाहीर केले कि, "एकाच आदेशाद्वारे सर्व ४.५ लाख रहिवाशांना दिलासा देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे सीइसी शिफारस करतील".

सीइसींच्या आदेशानुसार, डॉ. किरीट सोमैय्यांनी ४.५ लाख बाधित रहिवाशांच्या बाबतीतील इमारती, सर्वे क्र. यांचा तपशील सादर केला आहे. हा तपशील www.kiritsomaiya.com. या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

अशाच प्रकारे ठाण्यातील अशाच सर्व जुन्या निवासी भागांना/बांधकामांना दिलासा देता येईल.

दिल्ली येतील सुनावणीच्या वेळी डॉ. किरीट सोमैय्या आणि काही शेतकऱ्यांनी निष्पाप शेतकऱ्यांना संरक्षण पुरविण्याची विनंती केली. अशा तथाकथित खाजगी वन जमीनीवर ज्यांचे जीवनमान अवलंबून आहे अशा शेतकऱ्यांसाठी, १७ डिसेंबर रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. चालू असलेल्या बांधाकांमांसाठी १५ आणि १६ डिसेंबर रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

मुंबईतील बाधित व्यक्ती आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी डॉ. किरीट सोमैय्यांच्या
९-सी, नीलम नगर, मुलुंड (पूर्व), मुंबई -८० येथील कार्यालयात संपर्क करावा-
दूरध्वनि क्र.: २१६३४१५२/२१६३९६४९

*प्रसिद्धी सचिव*